# GOVERNMENT MEDICAL COLLEGE AND HOSPITAL, NAGPUR
# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, नागपूर

**क्रमांक**: शावैमवरु/नाग./ कंत्राटी -छात्रमानस योजना/पद भरती/जाहिरात/1895/२०२४-२५. दिनांक : 29 /01 /२०२५

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पदे भरण्याबात ( **जाहिरात** )

संदर्भ : महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक : कंत्राटी -०६२४/प्र.क्र. २३५/प्रशा-२ दिनांक ०८ ऑगस्ट २०२४.

महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग अधिपत्याखाली संचालयानाच्या अधिनस्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मध्ये शिक्षण घेण्याऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य सबलीकरणा करीता " **छात्रमानस योजना** " अंतर्गत छात्रमानस कक्ष सुरु करण्यासाठी " **मानसोपचार समुपदेशक** " ११ महिन्याच्या कंत्राटी / तात्पुरत्या स्वरूपाची 0२ पदे भरावयाची आहेत. त्याकरिता उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

## कंत्राटी पद भरती जाहिरात

| अनु क्र. | पदाचे नाव | पद संख्या | नियुक्तीचे ठिकाण | वय | शैक्षणिक अहर्ता | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मानसोपचार समुपदेशक (Psychiatric Counselor) | ०२ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर | किमान वय : - २१ वर्ष पूर्ण | MSW - (MASTER OF SOCIAL WORK) Specialization in Medical Psychiatry / M.A. Psychology- (Clinical Psychology) / Counseling Diploma 1 Yr. experience in Guidance & Counseling | रुपये ३0,000 / - दर महिना एकत्रित मानधन |

**अर्ज स्वीकृती दिनांक :- ०३ फेब्रुवारी २०२५ ते १० फेब्रुवारी २०२५ या कालावधी मध्ये , पत्ता : - मा. अधिष्ठाता, कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर- ४४०००३, वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.००** कार्यालयीन वेळेवर, शासकीय सुट्टीचा दिवस वगळून स्वीकारण्यात येतील. या कालावधीनंतर आलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाही. पदासाठी **मुलाखत दिनांक १३/०२/२०२५ रोजी ठीक दुपारी १२.०० वाजता मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांच्या दालनात ठेवण्यात आली आहे.** सदर जाहिरात आणि अर्ज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांच्या http://gmcnagpur.org/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# अटी व शर्ती

1. उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरूपाची असून नियुक्ती ही ११ महिन्याची राहील.

2. अर्जदार हा महाराष्ट्राचा नागरिक असावा.

3. मानसोपचार समुपदेशक यांची नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची प्रतिमाह रु. ३०,०००/- इतक्या एकत्रित मानधनावर ११ महिन्याच्या कालावधीसाठी असेल. तसेच, आवश्यकतेनुसार ही मुदत दिलेल्या कालावधीपूर्वी संपुष्टात आणण्याचे अधिकार संस्थेच्या अधिष्ठाता यांना राहील.

4. सदर नियुक्ती मानधन तत्वावर होणार असल्याने निवड झालेल्या उमेदवारांना कायमस्वरूपी नियुक्तीकरिता हक्क सांगता येणार नाही, शासकीय सोयी, सवलती यांचा लाभ मिळणार नाहीत. हे प्रकल्प संपुष्टात आल्यास नियुक्ती आपोआप संपुष्टात येतील.

5. केवळ शासकीय / निमशासकीय संस्थेमधील अनुभव ग्राह्य धरण्यात येतील.

6. उच्च शैक्षणिक अहर्ता धारक व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

7. नियुक्ती उमेदवाराकडून नियुक्ती कालावधी मध्ये बेशिस्त वर्तन, कामात कुचराई केल्यास व त्यांचे काम असमाधानकारक असल्यास त्यांची सेवा समाप्त करण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांच्याकडे आहे.

8. आवश्यक पात्रता असलेले उमेदवार न मिळाल्यास त्या पदाकरिता असलेली पात्रता अनुभव व शैक्षणिक अहर्ता नुसार शिथिल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे राखून ठेवलेले आहेत.

9. सर्व उमेदवाराने मूळ कागदपत्रे व त्याच्या साक्षांकित प्रतीसह मुलाखतीच्या दिवशी (दिनांक १३/०२/२०२५ रोजी ठीक दुपारी १२.०० वाजता ) उपस्थित राहावे.

10. नियुक्ती झाल्यानंतर सात दिवसाच्या आत कामावर रुजू व्हावे लागेल.

11. नियुक्तीपूर्वी उमेदवाराकडून शासनाकडे विहित नुमन्यात रु. १००/- चे स्टॅम्पपेपरवर करारनामा घेण्यात येईल. त्याचप्रमाणे उमेदवारावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा किंवा आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र लिखित स्वरूपात रुजू होतेवेळी सादर करावे लागेल. अन्यथा आपली नियुक्ती आपोआप संपुष्ठात येईल. अशा वेळेस प्रतिक्षाधीन यादीवरील उमेदवारास नियुक्ती आदेश दिला जाईल.

12. कोणतीही पूर्व सूचना न देता निवड प्रक्रिया व निकष बदलण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

13. मुलाखतीच्या दिवशी किंवा मुलाखतीस उमेदवार उपस्थित नसल्यास त्यांना मुलाखतीमध्ये अपात्र ठरविण्यात येईल. मुलाखतीकरिता येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा भत्ता (TA/DA) लागू राहणार नाही.

14. अर्ज स्वीकृती दिनांक :- ०३ फेब्रुवारी २०२५ ते १० फेब्रुवारी २०२५ या सात दिवसाच्या कालावधी मध्ये , पत्ता : मा. अधिष्ठाता, कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर-४४०००३, वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० कार्यालयीन वेळेवर, शासकीय सुट्टीचा दिवस वगळून स्वीकारण्यात येतील. या कालावधी नंतर आलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

सही /-
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर

DEAN
Govt. Medical College,
Nagpur

**GOVERNMENT MEDICAL COLLEGE AND HOSPITAL, NAGPUR**

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, नागपूर

## कंत्राटी पदभरति

<u>अर्जाचा नमुना</u>

__________________________ या पदासाठी अर्ज

प्रती,

---------------------------------------

---------------------------------------

---------------------------------------

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव : __________________________

इंग्रजी मध्ये (संपुर्ण नाव) : __________________________

२) संपूर्ण पत्ता : __________________________

__________________________

३) दूरध्वनी क्रमांक : __________________________

इमेल आयडी : __________________________

४) जन्म तारीख : __________________________

५) जातीचा प्रवर्ग : __________________________

६) शैक्षणिक अहर्ता : -

| अ.क्र | परीक्षेचे नाव | विद्यापीठ/मंडळाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकून गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

७) इतर शैक्षणिक अहर्ता : -

| अ.क्र | अभ्यासक्रमाचे नाव | संस्थेचे नाव | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

८) अनुभव : -

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | पदाचे नाव | कालावधी | | अनुभव एकून वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

९) अर्जासोबत खालील (छायांकित) प्रती जोडण्यात आलेल्या आहे. : -

| | |
|---|---|
| १. एस.एस.सी. मार्क्सशिट | होय / नाही |
| २. एच.एच.सी. मार्क्सशिट | होय / नाही |
| ३. पदवी डिग्री व मार्क्सशिट | होय / नाही |
| ४. पदविका डिग्री व मार्क्सशिट | होय / नाही |
| ५. जातीचा दाखला | होय / नाही |
| ६. जन्म तारखेचा दाखला | होय / नाही |
| ७. राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र | होय / नाही |
| ८. शाळा सोडल्याचा दाखला | होय / नाही |
| ९. अनुभव प्रमाणपत्रे | होय / नाही |
| १०. कॉम्पुटर प्रमाणपत्रे | होय / नाही |
| ११. इतर सर्टिफिकेट | होय / नाही |

उपोराक्त प्रमाणे मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमूद केलेली माहिती हि खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

उमेदवारची स्वाक्षरी

दिनाक :

स्थळ :